**खेड येथील सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग – १, खेड, ता. खेड, जि .रत्नागिरी.**

# <u>प्रतिकथन</u>

**<u>स.के.नं.७५/२०२६</u>**

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता **२०२३ चे प्रकरण २२** अन्वये संक्षिप्त संपरीक्षा केलेला **२०२६ चा** अविलंबित खटला अनुक्रमांक **७५** याचा अभिलेख श्री.एस.एम.चव्हाण प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, जि. रत्नागिरी. यांचे कार्यालय.

| | |
|---|---|
| १) अपराध घडल्याचा दिनांक | : ३१/०७/२०२५ |
| २) अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | : ३१/०७/२०२५ |
| ३) फिर्यादीचे संपूर्ण नांव, वय व त्याचे निवासस्थान इत्यादी | : सरकार तर्फे फिर्यादी समीर अंकुश वाघाटे, वय ४६ वर्षे, रा. भरणे, गवळवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी. |
| ४) आरोपीचे संपूर्ण नांव, वय व त्याचे निवासस्थान इत्यादी | : जगदिश दत्ताराम गांजेकर, वय ३० वर्षे, रा.आस्तान, जोरकरवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी. |
| ५)(अ) ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल | : |

दि.३१/०७/२०२५ रोजी दुपारी १२.४५ वा.चे सुमारास मुंबई–गोवा महामार्गावर मौजे उधळे, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील व्हॅगनर कार क्र. एम.एच.४३ सी.ई.०२९० ही अतिवेगाने चालविताना मिळून आला, म्हणून तुमचेविरूध्द मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

| | |
|---|---|
| (ब) कलम व अधिनियम | : मो.वा.का.क. १८४ |
| (क) मालतत्तेचे मुल्य | : –– |

६) आरोपीचे प्रतिकथन

प्रश्न क्र.१ :— तुम्हाला पोलिस पेपरच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर :— होय.

प्रश्न क्र.२ :— तुम्हाला तुमचेवर असलेला आरोप वाचून दाखविला तो तुम्हाला समजला काय?
उत्तर :— होय.

प्रश्न क्र.३ :— तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर :— होय, मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही—
(जगदिश दत्ताराम गांजेकर)

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.30 13:45:22 +0530

ठिकाण :— खेड
दिनांक :— २७/०३/२०२६

(एस. एम. चव्हाण)
न्यायदंडाधिकारी वर्ग—१, खेड

आज रोजी आरोपी न्यायालयात हजर. आरोपीस त्याचेवर तोहमत असलेल्या गुन्हयाचे स्वरुप त्याला समजेल अशा भाषेत वाचून व समजावून सांगितले असता त्याने गुन्हा कबुल केला. तसेच त्याने याकामी त्याच्या तोहमत असलेला गुन्हा मान्य व कबुल असलेची पुरशीस नि.२ कडे दाखल केली आहे. सदर आरोपीस त्याचेविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयासाठी असलेल्या शिक्षेची माहिती दिली. आरोपी हा स्वच्छेने व कोणाच्या दबावास बळी न पडता गुन्हा मान्य करत असल्याची खात्री केली. आरोपी हा स्वच्छेने व कोणाच्याही दबावास बळी न पडता गुन्हा कबुल करत असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

आरोपीने या आधी अशाच प्रकारचा गुन्हा केला किंवा त्याला अशाच गुन्हयात न्यायालयाने दोषी ठरविले याबाबत अभिलेखावर काहीही नाही. सबब आरोपीचा पहिलाच गुन्हा आहे. असे गृहित धरता येईल. आरोपीने केलेल्या गुन्हयासाठी मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ नुसार पहिल्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत परंतु सहा महिन्यापेक्षा कमी नसेल किंवा कमीत कमी १०००/— रूपये व जास्तीत जास्त ५०००/— रूपयापर्यंत द्रव्य दंडाची शिक्षा किंवा दोन्हीही शिक्षा देता येईल. आरोपीचा पहिला अपराध समजून त्याला तुरूंगवासाच्या शिक्षेऐवजी मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ च्या अपराधासाठी १,०००/— द्रव्य दंडाची शिक्षा देणे उचित ठरेल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

# आदेश

१. आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २२९ प्रमाणे मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ च्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात येत आहे.

२. मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ नुसार आरोपीला १,०००/— द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने द्रव्य दंडाची रक्कम न भरल्यास — दिवसाची साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.30 13:45:33 +0530

ठिकाण :— खेड
दिनांक :— २७.०३.२०२६

(एस. एम. चव्हाण)
न्यायदंडाधिकारी वर्ग—१, खेड

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C.No.75/2026 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 27.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 27.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 30.03.2026 |